अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार
१२.११.२०२६

वरुड
दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २८२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

थोडक्यात

विलीनीकरण-विलीनीकरण, किंवा ऑलम्पिक खेळ खेळता येईल का? मर्जर-मर्जर, फार इंट्रेस्टिंग...

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्याच्या राजकीय वतुर्ळात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून रंगली आहे. मात्र, दोन्ही पक्ष एकत्र आल्यास ते नेमक्या कोणत्या आघाडीत जाणार, इंडिया आघाडीत की महायुतीत, असाही सवाल उपस्थित होत आहे. अशातच या एकत्रिकरणाबाबत अनेक तर्क वितर्क लावले जात असतानाच आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी याबाबत मिश्कीलपणे भाष्य केलं आहे. माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, आपण अनेक वर्ष हे ऐकतो आहोत. नकार कोण देत नाही, राष्ट्रीय स्पर्धांत एक नवीन खेळ आणला पाहिजे विलीनीकरण-विलीनीकरण, किंवा ऑलम्पिक खेळ खेळता येईल का? मर्जर-मर्जर, फार इंट्रेस्टिंग खेळ आहे, मोठे-मोठे खेळाडू आहेत.

जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांचा हल्ला

बेपत्ता झालेल्या दोन एसपीओ जवानांचे मृतदेह आढळले, गोळ्या झाडून हत्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

जम्मू-काश्मीर – जम्मू-काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे.

बुधवारी बेपत्ता झालेल्या दोन स्पेशल पोलीस ऑफिसर जवानांचे मृतदेह गुरुवारी दच्छन परिसरातील जंगलात आढळून आले. दोन्ही जवानांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.



जंगल परिसरात शोधमोहीम

बुधवारी किश्तवाड जिल्ह्यातील दच्छन परिसरातील उंच डोंगराळ आणि घनदाट जंगल असलेल्या भागातून दोन्ही डझज जवान बेपत्ता झाले होते. त्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी व्यापक मोहीम हाती घेतली होती. या शोधमोहिमेत दुर्गम डोंगराळ भाग आणि जंगलांमध्ये विशेष पथके तैनात करण्यात आली होती. मिळालेल्या माहितीनुसार, ज्या ठिकाणाहून ते बेपत्ता झाले होते, त्या ठिकाणापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर त्यांचे मृतदेह सापडले. दोन्ही जवानांच्या शरीरावर गोळ्यांच्या अनेक जखमा आढळल्या आहेत.

बुधवारपासून होते बेपत्ता

मृत जवानांची नावे बाबी चंद आणि रशपाल कुमार अशी आहेत. बाबी चंद यांचे वय ५७ वर्षे, तर रशपाल कुमार यांचे वय ४५ वर्षे होते. दोघेही दच्छनमधील कियार गावात स्थानिक पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुपमध्ये तैनात होते.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी दोघेही आपल्या कॅम्पमधून धरना-मरवाह येथील लष्कराच्या चौकीकडे जात असताना बेपत्ता झाले होते. त्यावेळी त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र संपर्क होऊ शकला नाही. त्यानंतर त्यांचे मोबाईल फोन बंद असल्याचे आढळले.

दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांची मोहीम

दोन्ही डझज जवानांच्या हत्येमागे दहशतवाद्यांचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेत सहभागी असलेल्या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांनी परिसरात मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू केली आहे. जंगल आणि दुर्गम डोंगराळ भागात तपासाचा विस्तार करण्यात आला असून, सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत.

या घटनेमुळे किश्तवाड परिसरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

'पॅन' अन 'मतदार कार्ड' नागरिकत्वाचा पुरावा नाही

गुवाहाटी उच्च न्यायालयाने फेटाळला दावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

गुवाहाटी – पॅन कार्ड आणि मतदार ओळखपत्र (ईपीआयसी) हे भारतीय नागरिकत्वाचा पुरावा ठरू शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निकाल गुवाहाटी उच्च न्यायालयाने दिला आहे.

स्वयं-अर्जाच्या आधारे कोणतीही सखोल चौकशी न करता ही कागदपत्रे दिली जात असल्याने, जोपर्यंत त्यांच्याशी संबंधित मूळ नोंदी सिद्ध होत नाहीत तोपर्यंत त्यांना नागरिकत्वाचा पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या निकालासह न्यायालयाने आसाममधील एका महिलेची याचिका फेटाळून तिचा जामीन रद्द केला.

न्या. कल्याण राय सुराणा आणि न्या. सुस्मिता फुकन खाऊंद यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. एप्रिल १९७७ मध्ये जन्मलेल्या कुलचन बेगम या महिलेला आसाममधील फॉरेनर्स ट्रिब्युनलने २५ मार्च



१९७१ नंतर भारतात प्रवेश केल्याचे घोषित केले होते.

राष्ट्रीय नागरिक नोंदणीनुसार (एनआरसी) नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी तिने तिच्या पालकांचे राज्यातील सततचे वास्तव्य सिद्ध करणे आवश्यक होते. मात्र, सादर केलेल्या कागदपत्रांमधून ती तिच्या वडिलांची मुलगी आहे किंवा तिचे आजोबांशी नाते आहे, हे सिद्ध करण्यात ती अपयशी ठरली.

विसंगती आढळल्या

याचिकेत महिलेने असा दावा केला होता की, तिचे वडील भारतीय नागरिक होते आणि त्यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुका लढवण्यासोबतच गुवाहाटी महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम केले होते.

ट्रिब्युनलकडे नाही

मात्र, एरिया सभा प्रतिनिधीचे प्रमाणपत्र, एनआरसी अर्जाची पोहोच पावती, २०१८ ची मतदार यादी आणि रेशन कार्ड यांपैकी कोणतेही पुरावे हे नातेसंबंध व सततचे वास्तव्य सिद्ध करू शकले नाहीत. अतिरिक्त साक्षीदार आणि पालकांना ट्रिब्युनलसमोर सादर करण्यासाठी संधी देण्याची विनंतीही न्यायालयाने फेटाळून लावली.

एका सदस्याच्या अपात्रतेमुळे संपूर्ण कुटुंबाचा रेशनचा लाभ बंद करू नका

राज्य अन्न आयोगाची सरकारला सूचना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – एकाच शिधापत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कुटुंबातील एखादा सदस्य अपात्र ठरल्यास संपूर्ण कुटुंबाचा पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेचा लाभ बंद करू नये, अशी सूचना राज्य अन्न आयोगाने राज्य सरकारला केली आहे. प्रत्येक प्रकरणाची प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणी करून पात्र सदस्यांचा अन्नधान्याचा लाभ कायम ठेवावा, तसेच अपात्र ठरवून लाभ बंद केलेल्या नागरिकांपैकी पात्र असलेल्यांचा लाभ तातडीने पूर्ववत करावा, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.



केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीतील माहितीची प्राप्तिकर विभाग, केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळ, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय तसेच पीएम किसान योजनेच्या डेटाबेसशी पडताळणी करण्यात आली आहे. या पडताळणीच्या आधारे अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतून वगळण्याची कार्यवाही सुरू आहे. मात्र, ही प्रक्रिया राबविताना केवळ संशयाच्या आधारे कोणत्याही पात्र लाभार्थ्याचा अन्नधान्याचा लाभ बंद करू नये, अशी भूमिका राज्य सरकारनेही स्पष्ट केली आहे. राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी सरकारला पाठविलेल्या पत्रातून या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींकडे लक्ष वेधले आहे. अशा शिधापत्रिकेवरील एखादा सदस्य प्राप्तिकर भरत असल्यास किंवा त्याच्या नावावर चारचाकी वाहन असल्यास संपूर्ण शिधापत्रिकेवरील लाभार्थ्यांना अपात्र ठरविले जात असल्याच्या तक्रारी आयोगाकडे आल्या आहेत. एकाच शिधापत्रिकेवर नावे असली तरी काही सदस्य स्वतंत्रपणे राहत असतील, तर एका सदस्याच्या आर्थिक निकषांवरून अन्य सदस्यांचा अन्नधान्याचा लाभ बंद करणे योग्य नाही. अशा प्रकरणांत प्रत्यक्ष परिस्थितीची पडताळणी करून स्वतंत्रपणे राहणाऱ्या कुटुंबांचे स्वतंत्र शिधापत्रिकांमध्ये विभाजन करावे आणि पात्र सदस्यांना योजनेचा लाभ सुरू ठेवावा, असे आयोगाने सुचविले आहे.

मालवणी भाषेच्या संवर्धनासाठी संशोधन केंद्र!

स्वतंत्र शब्दकोशाची निर्मिती होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

सिंधुदुर्ग – मालवणी भाषा, संस्कृती आणि समृद्ध लोककलेचे जतन व संवर्धन करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात स्वतंत्र 'मालवणी संशोधन केंद्र' स्थापन करण्यात येणार आहे.



या केंद्राच्या माध्यमातून मालवणी भाषेचे शास्त्रीय संशोधन, दस्तऐवजीकरण, स्वतंत्र शब्दकोश निर्मिती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसार करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जिल्हा मराठी विकास केंद्रा'च्या माध्यमातून हे संशोधन केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केली.

मालवणी ही सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सांस्कृतिक अस्मितेचा महत्त्वाचा भाग आहे. या बोलीभाषेला समृद्ध शब्दसंपदा, म्हणी, साहित्य, लोकपरंपरा आणि स्वतंत्र सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा वारसा लाभला आहे. मात्र, या भाषेतील विविध बोली, शब्दसंपदा आणि लोकपरंपरांचे शास्त्रीय पद्धतीने संकलन व दस्तऐवजीकरण होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने संशोधन केंद्राची स्थापना करण्यात येणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले.

मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर मालवणी भाषेतील विविध बोलींचा स्वतंत्र शब्दकोश तयार करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे. या शब्दकोशाच्या माध्यमातून मालवणीतील प्रादेशिक शब्द, त्यांचे अर्थ, उच्चार आणि भाषिक वैशिष्ट्यांचे संकलन केले जाणार आहे. त्यामुळे मालवणी भाषेचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांना आणि नव्या पिढीला महत्त्वपूर्ण संदर्भ उपलब्ध होणार आहेत.

'तुम्ही गुजरातचे मुख्यमंत्री होणार आहात...'

❊ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितला तो रंजक किस्सा, जेव्हा पत्रकारानं दिली होती आनंदाची बातमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी नवी दिल्लीतील भाजपच्या केंद्रीय कार्यालयात आयोजित दिवाळी स्नेहसंमेलनात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिवाळी तसेच छठ सणाच्या शुभेच्छा दिल्या. पत्रकारांच्या धावपळीच्या कामाचा उल्लेख करत त्यांनी हलक्याफुलक्या शब्दांत टिप्पणीही केली.



'ब्रेकिंग न्यूजच्या घाईतून वेळ काढून आलात' पंतप्रधान मोदी म्हणाले की, सणासुदीच्या काळात प्रत्येकजण आपल्या कुटुंबीयांसोबत आणि जवळच्या व्यक्तींसोबत वेळ घालवण्याचा प्रयत्न करतो. मात्र, पत्रकारांचे कामाचे स्वरूप वेगळे असून बातम्यांच्या शोधात त्यांची सतत धावपळ सुरू असते.

ते म्हणाले, 'दिवाळीचा सण नुकताच पार पडला असून आता छठची तयारी अंतिम टप्प्यात आहे. या सणांसाठी मी तुम्हा सर्वांना आणि तुमच्या कुटुंबीयांना शुभेच्छा देतो.' पत्रकारांच्या व्यस्त वेळापत्रकावर बोलताना त्यांनी म्हटले की, ब्रेकिंग न्यूज मिळवण्यासाठी पत्रकारांची सतत धावपळ सुरू असते. फॅक्सपासून इन्स्टाग्राम रील्सपर्यंतचा प्रवास यावेळी पंतप्रधान मोदी यांनी माध्यम क्षेत्राशी असलेल्या आपल्या जुन्या संबंधांनाही उजाळा दिला. प्रसिद्धीपत्रकांपासून ते इन्स्टाग्राम रील्सपर्यंत माध्यमांमध्ये झालेला बदल आपण जवळून पाहिल्याचे त्यांनी सांगितले.



महिला आणि लघुउद्योजकांना दिलासा! केंद्र सरकारकडून पतहमी योजनांसाठी ९,१११ कोटींचा निधी मंजूर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – यासाठी 'स्टँड-अप इंडिया' निधीसाठी ४,१११ कोटी रुपये, तर 'मायक्रो युनिट्स' निधीसाठी ५,००० कोटी रुपये असे एकूण ९,१११ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

महिला, अनुसूचित जाती-जमाती आणि सूक्ष्म उद्योजकांना तारणाशिवाय कर्ज मिळणे अधिक सुलभ व्हावे, यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने दोन पतहमी योजनांना पुढील ५ वर्षांसाठी सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे. यासाठी 'स्टँड-अप इंडिया' निधीसाठी ४,१११ कोटी रुपये, तर 'मायक्रो युनिट्स' निधीसाठी ५,००० कोटी रुपये असे एकूण ९,१११ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. स्टँड-अप इंडिया योजनेतून उद्योजकांना कर्जाची हमी सरकारच्या अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, स्टँड-अप इंडिया योजनेअंतर्गत नवीन उद्योग सुरू करणाऱ्या महिला आणि अनुसूचित जाती-जमातीतील उद्योजकांना १० लाख रुपयांपेक्षा अधिक आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी पतहमी दिली जाणार आहे.

या योजनेत प्रत्येक बँक शाखेला सरासरी दोन कर्जे देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी एक कर्ज महिला उद्योजिकेला, तर दुसरे अनुसूचित जाती किंवा जमातीतील उद्योजकाला देण्याचे नियोजन आहे.

या योजनेतील वार्षिक हमी शुल्क ०.५० टक्के असेल. तसेच अतिरिक्त जोखीम प्रीमियम आकारला जाणार नाही. कर्जाच्या प्रकारानुसार हमी कवच ८५ टक्क्यांपर्यंत असू शकते. कर्जदारांना कर्ज प्रक्रियेपासून व्यवसाय सुरू केल्यानंतरच्या टप्प्यापर्यंत आवश्यक साहाय्य देण्यावरही भर दिला जाणार आहे.

मुद्रा कर्जावरील हमी शुल्कात कपात

प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत (झचचध) सूक्ष्म उद्योजकांना दिल्या जाणाऱ्या कर्जासाठीही सरकारने महत्त्वाचा बदल केला आहे. या योजनेतील वार्षिक हमी शुल्क १ टक्क्यांवरून ०.७५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात येणार आहे.

सरकारच्या अंदाजानुसार, मुद्रा क्रेडिट गॅरंटी फंडाच्या माध्यमातून १२.६० लाख कोटी रुपयांच्या मुद्रा कर्जांना आधार मिळण्याची अपेक्षा आहे. यामध्ये २० लाख रुपयांपर्यंतची मुद्रा कर्जे, प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत १०,००० रुपयांपर्यंतची ओव्हरड्राफ्ट सुविधा आणि स्वयं-सहायता गटांना दिल्या जाणाऱ्या १० ते २० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जांचा समावेश आहे.

ही कर्जे तारणाशिवाय उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. सूक्ष्म उद्योजकांना अधिक कर्जपुरवठा मिळावा, यासाठी कर्जदात्या संस्थांच्या दाव्यांवरील प्रक्रियाही अधिक सक्षम करण्याचे सरकारचे नियोजन आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये नवी मुंबई देशात अव्वल

४,७५१ शहरांना मागे टाकत मिळवला पहिला क्रमांक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नवी मुंबई – स्वच्छतेच्या बाबतीत नवी मुंबईने पुन्हा एकदा देशात आपली छाप पाडली आहे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने देशातील ४,७५१ शहरांमध्ये पहिला क्रमांक मिळवला आहे. या यशामुळे नवी मुंबईला देशातील सर्वाधिक स्वच्छ शहराचा मान मिळाला आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महानगरपालिकेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या यशाबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईकरांचे आणि महानगरपालिकेच्या संपूर्ण यंत्रणेचे अभिनंदन केले आहे. शहरातील नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि सफाई कामगार यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हे यश मिळाल्याचे त्यांनी म्हटले आहे. नवी मुंबईने स्वच्छतेसाठी सातत्याने केलेले काम, योग्य नियोजन आणि नागरिकांचा सहभाग यामुळे देशातील हजारो शहरांमध्ये अव्वल स्थान मिळवले.

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेकडून विविध उपक्रम राबवले जातात. या कामात नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेतला. प्रशासन आणि नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे यश असल्याचे मानले जात आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्याला नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे, महापौर सुजाता पाटील आणि उपमहापौर दशरथ भगत उपस्थित होते. महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केलेल्या मेहनतीचेही या पुरस्कारामुळे कौतुक होत आहे.

एकनाथ शिंदे यांनी शहरातील सफाई कामगारांचे विशेष अभिनंदन केले. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी हे कर्मचारी नियमितपणे मेहनत घेतात. त्यांच्या कामामुळेच नवी मुंबईला हा राष्ट्रीय सन्मान मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

भविष्यातही नवी मुंबईने स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक शहर म्हणून आपली ओळख कायम ठेवावी, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

सोनं खरेदीच्या बहाण्याने दुकानात शिरले अन अडीच तोळ्यांच्या अंगठ्या घेऊन पळाले!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – नाशिक : सोन्याचे दागिने खरेदी करण्यासाठी ग्राहक बनून दुकानात यायचं, दुकानदाराला बोलण्यात गुंतवायचं आणि संधी मिळताच दागिने घेऊन पसार व्हायचं! नाशिकमध्ये रविवारी (दि.८) चोरीचा असाच एक धक्कादायक प्रकार घडला आहे.

जात्रा हॉटेल परिसरातील एका सराफाच्या दुकानात दोन व्यक्ती ग्राहक असल्याचं भासवून आल्या. त्यांनी सोन्याच्या अंगठ्या दाखवण्यास सांगितलं. त्यानंतर दुकानदाराचं लक्ष विचलित करून तब्बल अडीच तोळे सोन्याच्या अंगठ्या असलेली ट्रे घेऊन पळ काढला.

विशेष म्हणजे, हा संपूर्ण प्रकार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्याचा व्हिडीओही समोर आला आहे. दुकानदाराला बोलण्यात गुंतवलं अन संधी साधली समोर आलेल्या माहितीनुसार, नाशिकमधील जात्रा हॉटेल परिसरात ही घटना घडली.

पाण्याचा अपव्यय : आयुक्तांचे आदेश धाब्यावर, रस्त्यांवर मोटरद्वारे पाण्याचा वापर करून धुतली जातात वाहने

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबईतील पाणी समस्येच्या पार्श्वभूमीवर पिण्याचा पाण्याचा अपव्यय होवून तसेच पिण्या व्यतिरिक्त इतर कामांसाठी इतर पाण्याचा वापर करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना महापालिका प्रशासनाने जारी केलेल्या आहे.

त्याअंतर्गत जागोजागी रस्त्यांवर वाहने धुण्याची सर्विस सेंटर उभी आहे, त्यावर त्वरीत कारवाई करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी दिल्यांनतरही मुंबईत आजही अशाप्रकारची बेसुमार पाण्याचा वापर करून वाहने धुणारी सर्विस सेंटर सुरुच आहेत. या सर्विस सेंटरमध्ये महापालिकेच्या पिण्याचाच पाण्याचा वापर होत असून काही ठिकाणी फक्तच टँकरच्या पाण्याचा वापर होत आहे.

परंतु आयुक्तांच्या निर्देशानंतरही या सर्विस सेंटरवर कारवाई करण्यासाठी महापालिकेच्या एकाही सहायक आयुक्तांचे हात धजावत नाही.

त्यामुळे आयुक्तांचे आदेशही यामाध्यमातून धाब्यावर मारले जात आहेत. मुंबईत यंदा पाण्याचा साठा मुबलक असला तरी काही जिल्ह्यांमधील गावांमध्ये पाण्याचा दुष्काळ पसरला आहे.

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चांदरम्यान तटकरे-फडणवीस भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाबाबत राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी मंगळवारी झालेल्या दीड तासाच्या चर्चेनंतर बुधवारी तटकरे यांनी वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्याने या गाठीभेटींना राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, ही भेट दिवाळीनिमित्त सदिच्छा भेट असल्याचे सांगण्यात आले.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचा विलिनीकरणाबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही आमदारांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेण्यासाठी वेळ मागितल्याची माहितीही समोर आली आहे. यामुळे दोन्ही गट पुन्हा एकत्र येणार का, याबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर तटकरे यांनी मंगळवारी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. त्यानंतर बुधवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी त्यांची चर्चा झाली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनीही बुधवारी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. दिवाळीनिमित्त शुभेच्छा देण्यासाठी ही भेट घेतल्याचे मुंडे यांनी सांगितले. या वेळी मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची माहिती देत राज्यातील शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांकडे केली. त्यावर शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे मुंडे यांनी स्पष्ट केले.

रब्बी हंगामासाठी केंद्राकडून ६२ हजार ३७० कोटींची तरतूद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील खतांच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामात दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकारने २०२६-२७च्या रब्बी हंगामासाठी फॉस्फेट आणि पोटॅशयुक्त खतांच्या पोषक तत्त्वाधारित अनुदानाच्या (एनबीएस) दरांना मंजुरी दिली असून, यासाठी ६२ हजार ३७०.०२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या हंगामाच्या तुलनेत अनुदानात २४ हजार ४१७.७३ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, डीएपी खताची ५० किलोची गोणी १ हजार ३५० रुपये या दरानेच उपलब्ध करून दिली जाणार आहे. महाराष्ट्रात यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांची भिस्त सरकारी मदत आणि उपलब्ध संसाधनांवर असताना खत अनुदानातील वाढ महत्त्वाची मानली जात आहे. पश्चिम आशियातील इराण-इस्त्रायल-अमेरिका संघर्ष आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक खतपुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. खतांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती आणि आयात खर्चातही वाढ झाली आहे. युरिया, डीएपी, म्युरेट ऑफ पोटॅश (एमओपी) आणि सल्फर यांच्या आंतरराष्ट्रीय किमतींचा विचार करून यंदाचे अनुदान निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे जागतिक बाजारातील दरवाढीचा अतिरिक्त भार देशांतर्गत शेतकऱ्यांवर पडू नये, असा सरकारचा प्रयत्न आहे.

गेल्या रब्बी हंगामात खत अनुदानासाठी ३७ हजार ९५२.२९ कोटी रुपयांची तरतूद होती. यंदा ती ६२ हजार ३७०.०२ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. म्हणजेच अनुदानाच्या रकमेत सुमारे ६४.३ टक्क्यांची वाढ झाली आहे.

सरकारी बँकांची शेअर मार्केटमध्ये मोठी झेप!

आयओबी आणि सेंट्रल बँकेच्या हजारो कोटींच्या प्लॅनमुळे उडाली खळबळ!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – भारतीय बँकिंग क्षेत्रात लवकरच मोठे बदल पाहायला मिळण्याची शक्यता आहे. पीटीआयच्या अहवालानुसार, सार्वजनिक क्षेत्रातील तीन प्रमुख बँकांनी आपले भागभांडवल वाढवण्यासाठी आणि सेबीच्या नियमांची पूर्तता करण्यासाठी क्यूआयपी द्वारे नवीन भांडवल उभारण्याची योजना आखली आहे.

आयओबीचे ५००० कोटी रुपयांचे टार्गेट

इंडियन ओव्हरसीज बँकेला (आयओबी) आर्थिक वर्ष २०२७ मध्ये क्यूआयपीच्या माध्यमातून ५००० कोटी रुपयांपर्यंत निधी उभारण्याची मंजुरी मिळाली आहे. बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ अजय कुमार श्रीवास्तव यांनी दिलेल्या माहितीनुसार, बँकेने जवळपास सर्व आवश्यक मंजुऱ्या मिळवल्या आहेत. बाजारपेठेतील परिस्थितीनुसार डिसेंबर तिमाहीच्या शेवटी किंवा मार्च तिमाहीच्या सुरुवातीला हा इश्यू लाँच केला जाण्याची शक्यता आहे.

जर संपूर्ण रक्कम उभी राहिली, तर बँकेतील सरकारची मालकी ९२.४४% वरुन घसरुन सुमारे ८६ पर्यंत खाली येऊ शकते, ज्यामुळे सुमारे ६ टक्क्यांची हिस्सेदारी कमी होईल.

पंजाब अँड सिंध बँक आणि सेंट्रल बँकेची रणनीती

पंजाब अँड सिंध बँकेने देखील आपली आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी आणि सार्वजनिक हिस्सा वाढवण्यासाठी संस्थात्मक निधी उभारणीचा मार्ग निवडला आहे. बँकेने मर्चंट बँकर नियुक्त केले असून संभाव्य गुंतवणूकदारांसोबी चर्चा सुरू केली आहे.

तसेच, सेंट्रल बँक ऑफ इंडियाने भागधारकांची मंजुरी घेऊन टखझ, फॉलो-ऑन पब्लिक ऑफर आणि राइट्स इश्यूच्या माध्यमातून तब्बल ७,०० सेबीचे नियम आणि भविष्यातील फायदा सेबीच्या नियमांनुसार, सर्व सूचीबद्ध कंपन्यांना किमान २५% सार्वजनिक शेअरहोल्डिंग राखणे बंधनकारक आहे.

या ताज्या इक्विटी इश्यूमुळे बँकांना सरकारी मालकी कमी करण्यास आणि भविष्यातील व्यावसायिक विस्तारासाठी आपला भांडवल पाया मजबूत करण्यास मोठी मदत मिळणार आहे. मात्र, ही सर्व योजना बाजारातील परिस्थिती आणि संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या मागणीवर अवलंबून असेल.

संपादकीय

राष्ट्र प्रथमचा विचार रुजविणारे ज्येष्ठ नेतृत्व : लालकृष्ण अडवाणी

भारतीय राजकारणाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे योगदान केवळ राजकीय सत्तेपुरते मर्यादित राहत नाही, तर ते विचारांची दिशा देणारे आणि कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्यांना घडविणारे ठरतात. भारतरत्न लालकृष्ण अडवाणी हे अशाच द्रष्ट्या आणि अनुभवी नेतृत्वांपैकी एक आहेत. भारतीय राजकारणातील त्यांचा प्रदीर्घ प्रवास, संघटन कौशल्य, वैचारिक निष्ठा आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका यामुळे त्यांचे स्थान वेगळे आहे. अडवाणीजींच्या राजकीय जीवनाकडे पाहताना त्यांच्या संघर्षाची, समर्पणाची आणि पक्षसंघटनेसाठी केलेल्या अथक परिश्रमांची जाणीव होते. भारतीय जनता पक्षाच्या जडणघडणीत त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले आहे. पक्षाची विचारधारा जनमानसापर्यंत पोहोचविणे, कार्यकर्त्यांचे संघटन उभे करणे आणि सामान्य कार्यकर्त्याला राजकीय प्रवाहात स्थान मिळवून देणे, या बाबींमध्ये त्यांनी मोलाची भूमिका बजावली. राजकारणात पदे आणि सत्ता येतात-जातात; मात्र विचारांचे अधिष्ठान कायम राहते. अडवाणीजींनी कार्यकर्त्यांच्या मनात रुजविलेला 'राष्ट्र प्रथम' हा विचार त्यांच्या राजकीय प्रवासाचा केंद्रबिंदू राहिला. कोणत्याही पक्षासाठी केवळ निवडणुका जिंकणे महत्त्वाचे नसते, तर विचारांशी निष्ठा राखणारे कार्यकर्ते घडविणे अधिक महत्त्वाचे असते. ही बाब अडवाणीजींच्या कार्यातून अधोरेखित होते. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राजकारणात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. मतभेद, संघर्ष आणि राजकीय आव्हाने यांचा सामना करताना त्यांनी संघटनात्मक ताकदीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या राजकीय भूमिकांवर अनेकदा चर्चा आणि टीकाही झाली; परंतु भारतीय राजकारणाच्या वाटचालीवर त्यांनी उमटविलेला ठसा नाकारता येणार नाही. आजच्या राजकीय परिस्थितीत विचारांपेक्षा व्यक्तिकेंद्रित राजकारणाला अधिक महत्त्व मिळताना दिसते. पक्षनिष्ठा, वैचारिक बांधिलकी आणि संघटनात्मक शिस्त या मूल्यांचे महत्त्व नव्या पिढीला समजावून सांगण्याची गरज आहे. अशा वेळी अडवाणीजींचा प्रदीर्घ अनुभव आणि त्यांचा राजकीय प्रवास नव्या पिढीतील कार्यकर्त्यांसाठी अभ्यासाचा विषय ठरतो. शंभराव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या ज्येष्ठ नेत्याच्या आयुष्याचा गौरव करताना केवळ त्यांच्या राजकीय यशाचा उल्लेख करून चालणार नाही, तर त्यांनी उभ्या केलेल्या कार्यकर्त्यांच्या पिढ्या आणि रुजविलेल्या वैचारिक मूल्यांचाही विचार झाला पाहिजे. ज्येष्ठ नेत्यांचा सन्मान हा केवळ औपचारिकता नसून त्यांच्या अनुभवातून प्रेरणा घेण्याची संधी असते. आज देशाला विकासाची दृष्टी, राष्ट्रहिताची जाणीव आणि लोकशाही मूल्यांप्रती बांधिलकी असलेले नेतृत्व आवश्यक आहे. राजकीय मतभिन्नता असली तरी ज्येष्ठ नेत्यांच्या योगदानाचा सन्मान राखणे ही भारतीय लोकशाहीची परंपराअडवाणीजींचे शतकाकडे वाटचाल करणारे आयुष्य हे भारतीय राजकारणातील एका महत्त्वपूर्ण पर्वाचे प्रतीक आहे. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांचा अनुभव व विचार पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहोत, हीच सदिच्छा!



*** परिस्थिती कितीही कठीण असली तरी स्वत:वरील विश्वास कधीही कमी करु नका**
कारण अंधार कितीही गडद असला तरी पहाट नक्कीच होते. *

चिप्सच्या महासंग्रामात हेरगिरीचे सावट! अमेरिका-चीन संघर्षाला नवे वळण?

जगातील कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर आणि अत्याधुनिक चिप्सच्या बाजारपेठेवर वर्चस्व मिळिवण्यासाठी अमेरिका आणि चीन यांच्यात सुरू असलेली स्पर्धा आता केवळ व्यापारापुरती मर्यादित राहिलेली नाही. एनव्हिडीयाचे प्रमुख जेन्सेन हुआंग यांच्याभोवती निर्माण झालेल्या कथित चिनी हेरगिरीच्या प्रकरणामुळे जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील सुरक्षा, विश्वास आणि राष्ट्रीय हिताचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

जग आज एका नव्या तंत्रज्ञान क्रांतीच्या उंबरठ्यावर उभे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सेमीकंडक्टर आणि अत्याधुनिक संगणकीय चिप्स हे केवळ उद्योगजगताचे विषय राहिलेले नाहीत, तर ते एखाद्या देशाच्या आर्थिक सामर्थ्याचे, संरक्षण क्षमतेचे आणि जागतिक महासत्ता म्हणून असलेल्या स्थानाचे प्रमुख आधार बनले आहेत. त्यामुळेच या क्षेत्रात अमेरिका आणि चीन यांच्यात सुरू असलेली स्पर्धा दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे.

या स्पर्धेच्या केंद्रस्थानी आहे अमेरिकेची एनव्हिडीया ही जगातील आघाडीची तंत्रज्ञान कंपनी. कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी आवश्यक असलेल्या अत्याधुनिक चिप्सच्या निर्मिती आणि पुरवठ्यात या कंपनीचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. एनव्हिडीयाचे प्रमुख जेन्सेन हुआंग हे जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तिमत्त्व मानले जातात. अशा कंपनीच्या प्रमुखाभोवती चिनी गुप्तचर यंत्रणेशी संबंधित असल्याचा आरोप असलेल्या व्यावसायिक महिलेच्या संपर्काचे प्रकरण समोर येणे, ही साधी व्यावसायिक बातमी नाही. त्याचे परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारण, व्यापार आणि राष्ट्रीय सुरक्षेपर्यंत पोहोचू शकतात.

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनुसार, जेन्सेन हुआंग यांचे ॲलिस हुआंग नावाच्या व्यावसायिक महिलेशी जवळचे संबंध असल्याचे समोर आले. अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांना तिच्या चीनशी संबंधित कथित गुप्तचर संपर्काबाबत संशय असल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर एनव्हिडीयाच्या संचालक मंडळाने स्वतंत्र चौकशी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या प्रकरणात कंपनीची गोपनीय माहिती किंवा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित माहिती प्रत्यक्षात लीक झाली आहे, असा निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही. चीननेही हेरगिरीचे आरोप फेटाळले आहेत. त्यामुळे आरोप आणि सिद्ध झालेले तथ्य यातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे.

चिप्स म्हणजे नव्या युगातील सामरिक शस्त्र!

आजच्या काळात ज्याच्याकडे अत्याधुनिक चिप्सचे तंत्रज्ञान आहे, त्याच्याकडे भविष्यातील अर्थव्यवस्थेवर प्रभाव टाकण्याची क्षमता आहे. मोबाईल, संगणक, अंतराळ संशोधन, संरक्षण व्यवस्था, आधुनिक वाहने, वैद्यकीय उपकरणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता या सर्व क्षेत्रांचा पाया सेमीकंडक्टर चिप्सवर उभा आहे.

विशेषतः एआय क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या उच्च क्षमतेच्या चिप्सचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. या चिप्सच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर माहितीचे विश्लेषण, गुंतागुंतीची गणिते आणि अत्याधुनिक एआय प्रणालींचे प्रशिक्षण शक्य होते. त्यामुळे या तंत्रज्ञानावर नियंत्रण मिळिवणे म्हणजे भविष्यातील आर्थिक आणि सामरिक सामर्थ्यावर प्रभाव निर्माण करणे होय.

अमेरिकेला आपले तंत्रज्ञानविषयक वर्चस्व कायम ठेवायचे आहे, तर चीनला परकीय तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी करून स्वदेशी क्षमता वाढवायची आहे. यासाठी चीन मोठ्या प्रमाणावर संशोधन आणि विकासात गुंतवणूक करीत आहे. दुसरीकडे अमेरिका अत्याधुनिक चिप्स आणि त्यासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञानाच्या चीनकडे होणाऱ्या निर्यातीवर विविध निर्बंध घालत आहे.

या संघर्षात एनव्हिडीयाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे ठरते. कारण कंपनीच्या चिप्सचा वापर जगातील मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या आणि संशोधन संस्था करतात. त्यामुळे या कंपनीशी संबंधित कोणतीही सुरक्षा समस्या अमेरिकेसाठी चिंतेचा विषय ठरणे स्वाभाविक आहे.

हेरगिरीच्या आरोपांमागील गंभीर प्रश्न

एनव्हिडीयाच्या प्रमुखांभोवती निर्माण झालेल्या प्रकरणाकडे केवळ एका व्यक्तीच्या खासगी आयुष्याशी जोडून पाहणे योग्य ठरणार नाही. एखाद्या जागतिक तंत्रज्ञान कंपनीच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीपर्यंत परकीय गुप्तचर यंत्रणेला पोहोचण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप असेल, तर त्यामागील संभाव्य उद्देश आणि त्यातून निर्माण होणारे धोके तपासणे आवश्यक आहे.

मोठ्या कंपन्यांकडे केवळ उत्पादनाचे तंत्रज्ञान नसते, तर त्यांच्याकडे भविष्यातील संशोधन योजना, ग्राहकांची माहिती, व्यावसायिक धोरणे, उत्पादन क्षमता आणि बाजारपेठेतील हालचालींची महत्त्वपूर्ण माहिती असते. अशा माहितीचा उपयोग प्रतिस्पर्धी देशाला आपल्या तंत्रज्ञानविषयक धोरणासाठी होऊ शकतो.

रॉयटर्सने १० नोव्हेंबर रोजी दिलेल्या वृत्तात 'द इन्फॉर्मेशन'च्या हवाल्याने एनव्हिडीयाच्या चिप्सच्या चीनकडे झालेल्या कथित पुरवठ्याबाबत सुमारे ७.५ अब्ज डॉलरचा आकडा नमूद केला आहे. मात्र, हा वृत्ताधारित दावा असून त्यातील व्यवहार, पुरवठा साखळी आणि संबंधित व्यक्तींची भूमिका यांची स्वतंत्र चौकशी आवश्यक आहे.

Investing.com+1 या प्रकरणात सर्वांत महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, परकीय गुप्तचर यंत्रणेने एखाद्या व्यक्तीशी संबंध प्रस्थापित करून माहिती मिळिवण्याचा प्रयत्न केला असेल, तर त्या प्रयत्नांची व्याप्ती किती होती? कंपनीच्या व्यवस्थापनापर्यंत, व्यावसायिक निर्णयांपर्यंत किंवा तंत्रज्ञानविषयक धोरणांपर्यंत त्याचा प्रभाव पोहोचला होता का? या प्रश्नांची उत्तरे चौकशीतूनच स्पष्ट होतील.

अमेरिकेसाठी प्रतिष्ठेचा आणि सुरक्षेचा प्रश्न

अमेरिका अनेक दशकांपासून जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर आहे. सिलिकॉन व्हॅली, संशोधन संस्था, विद्यापीठे आणि मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या माध्यमातून अमेरिकेने जागतिक अर्थव्यवस्थेत आपले स्थान निर्माण केले आहे. मात्र, चीनकडून मिळत असलेल्या तंत्रज्ञानविषयक आव्हानामुळे अमेरिकेची चिंता वाढली आहे.



अमेरिकेने चीनला अत्याधुनिक चिप्स आणि सेमीकंडक्टर उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या काही तंत्रज्ञानाचा पुरवठा मर्यादित केला आहे. यामागे राष्ट्रीय सुरक्षा आणि लष्करी उपयोगाच्या शक्यता ही प्रमुख कारणे आहेत.

परंतु दुसरीकडे अमेरिकन कंपन्यांसाठी चीन ही मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे कंपन्यांना व्यापार वाढवायचा आहे, तर सरकारला तंत्रज्ञानाची सुरक्षितता जपायची आहे. या दोन उद्दिष्टांमध्ये अनेकदा संघर्ष निर्माण होतो.

एनव्हिडीयाच्या प्रकरणामुळे हाच संघर्ष पुन्हा एकदा उघड झाला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने ८ नोव्हेंबर रोजी स्वतंत्र चौकशी जाहीर केली. कंपनीने उपलब्ध माहितीनुसार राष्ट्रीय सुरक्षेला किंवा कंपनीच्या गोपनीय माहितीला धोका पोहोचल्याचा कोणताही पुरावा असल्याचे म्हटलेले नाही. तरीही सर्व बाबींची तपासणी केली जाणार आहे. Statement from NVIDIA Board of Directors+1

चीनची तंत्रज्ञान क्षेत्रातील महत्त्वाकांक्षा

चीनला जागतिक महासत्ता म्हणून स्वतःचे स्थान अधिक मजबूत करायचे आहे. उत्पादन क्षेत्र, इलेक्ट्रॉनिक्स, दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सेमीकंडक्टर उद्योगात चीनने मोठी प्रगती केली आहे. मात्र, अत्याधुनिक चिप्सच्या बाबतीत अजूनही काही महत्त्वाच्या तंत्रज्ञानासाठी त्याला परदेशी पुरवठा साखळीवर अवलंबून राहावे लागते.

हीच बाब चीनच्या तंत्रज्ञान धोरणातील महत्त्वाची अडचण आहे. अत्याधुनिक चिप्सची निर्मिती करण्यासाठी केवळ पैसा किंवा कारखाने पुरेसे नसतात. त्यासाठी प्रगत संशोधन, विशेष उपकरणे, उत्पादन प्रक्रिया, कुशल अभियंते आणि अनेक वर्षांचा अनुभव आवश्यक असतो.

त्यामुळे चिप्सशी संबंधित माहिती, संशोधन आणि तंत्रज्ञान मिळिवण्यासाठी जागतिक स्तरावर तीव्र स्पर्धा सुरू आहे. अशा परिस्थितीत गुप्तचर यंत्रणांकडून तंत्रज्ञानविषयक माहिती मिळिवण्याचे कथित प्रयत्न झाले असतील, तर ते आंतरराष्ट्रीय व्यापारातील विश्वासाला धक्का देणारे ठरू शकतात.

मात्र, चीनवर करण्यात आलेल्या प्रत्येक आरोपाला अंतिम सत्य मानणेही योग्य नाही. कोणत्याही देशावरील हेरगिरीचे आरोप पुराव्यांच्या आधारे तपासले गेले पाहिजेत. या प्रकरणात चीनने आरोप फेटाळले असून चौकशीचे निष्कर्ष समोर येणे महत्त्वाचे आहे.

भारतासाठी यातून कोणता संदेश?

अमेरिका आणि चीन यांच्यातील हा तंत्रज्ञान संघर्ष भारतासाठीही महत्त्वाचा आहे. भारताने सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रात स्वतःची क्षमता विकसित करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. देशांतर्गत चिप उत्पादन, संशोधन, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जात आहे.

जगातील दोन मोठ्या अर्थव्यवस्थांमधील तणाव वाढत असताना भारतासमोर एकीकडे संधी आहेत, तर दुसरीकडे आव्हानेही आहेत. जागतिक कंपन्यांना चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी उत्पादन केंद्रांची गरज भासू शकते. अशा वेळी भारत आपली औद्योगिक क्षमता वाढवू शकतो. मात्र, केवळ परकीय कंपन्यांना भारतात गुंतवणुकीसाठी आमंत्रित करून भागणार नाही. आपल्याला स्वतःचे संशोधन, कुशल मनुष्यबळ, आधुनिक उत्पादन सुविधा आणि तंत्रज्ञानविषयक बौद्धिक संपदेचे संरक्षण यावर भर द्यावा लागेल.

भारताने या प्रकरणातून एक गोष्ट नक्की शिकली पाहिजे. तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती करण्याइतकेच त्या तंत्रज्ञानाची सुरक्षा राखणेही महत्त्वाचे आहे. कारण भविष्यातील संघर्ष केवळ सीमांवर होणार नाहीत, तर माहिती, डेटा, संगणकीय क्षमता आणि तंत्रज्ञानाच्या नियंत्रणावरही अवलंबून असतील.

कॉर्पोरेट जगतासाठीही धोक्याची घंटा

या संपूर्ण प्रकरणाने जागतिक कॉर्पोरेट क्षेत्रासमोर एक मोठा प्रश्न निर्माण केला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमुख, वरिष्ठ अधिकारी आणि महत्त्वाच्या संशोधन विभागांमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती या केवळ व्यावसायिक निर्णय घेणाऱ्या व्यक्ती नसतात. त्यांच्या हातात कंपनीच्या भवितव्याशी संबंधित अत्यंत संवेदनशील माहिती असते.

त्यामुळे कंपन्यांनी आपल्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. व्यावसायिक संबंध, भागीदारी, गुंतवणूक आणि माहितीची देवाणघेवाण यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे.

एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक वर्तनामुळे संपूर्ण कंपनीच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होऊ शकतो, हेही या प्रकरणातून स्पष्ट होते. त्यामुळे कॉर्पोरेट प्रशासन, संचालक मंडळाची जबाबदारी आणि माहिती सुरक्षेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

महासत्तांच्या स्पर्धेत विश्वासाचा बळी जाऊ नये!

आज अमेरिका आणि चीन यांच्यातील स्पर्धा केवळ दोन देशांपुरती मर्यादित राहिलेली नाही. जगातील अनेक देश या स्पर्धेचे परिणाम अनुभवत आहेत. चिप्सच्या पुरवठ्यावर निर्बंध, तंत्रज्ञान हस्तांतरणावरील मर्यादा, व्यापारातील अनिश्चितता आणि गुप्तचर यंत्रणांशी संबंधित आरोप यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. एनव्हिडीयाच्या प्रमुखांभोवती निर्माण झालेले प्रकरण अद्याप चौकशीच्या टप्प्यात आहे. त्यामुळे कोण दोषी आहे, कोण निर्दोष आहे किंवा नेमकी किती माहिती बाहेर गेली, याबाबत घाईने निष्कर्ष काढता येणार नाही. मात्र, या घटनेने जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील सुरक्षेचा प्रश्न किती गंभीर बनला आहे, हे निश्चितपणे अधोरेखित केले आहे.


शेवटी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, भविष्यातील जगावर वर्चस्व मिळिवण्याची लढाई आता तेल, नैसर्गिक वायू किंवा पारंपरिक शस्त्रास्त्रांपुरती मर्यादित राहिलेली नाही. ती कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, डेटा आणि संगणकीय सामर्थ्याभोवती केंद्रित होत आहे. या नव्या स्पर्धेत माहिती हीच ताकद आणि माहितीची सुरक्षितता हेच सामर्थ्य ठरणार आहे.

एनव्हिडीयाचे प्रकरण हे केवळ एका कंपनीच्या प्रमुखाभोवती निर्माण झालेले वादळ नाही, तर भविष्यातील जागतिक सत्तासंघर्षाचे एक महत्त्वपूर्ण संकेतस्थळ आहे. तंत्रज्ञानावर वर्चस्व मिळिवण्यासाठी सुरू असलेल्या या स्पर्धेत कोण पुढे राहील, यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, या स्पर्धेत जागतिक विश्वास, व्यापारातील पारदर्शकता आणि राष्ट्रीय सुरक्षेचे संतुलन कसे राखले जाणार? कारण चिप्सच्या या महासंग्रामात एखाद्या देशाचा विजय किंवा पराभव एवढाच विषय नाही; तर संपूर्ण जगाच्या तंत्रज्ञानाधारित भविष्याचा प्रश्न दडलेला आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

कांदिवलीत ड्रग्ज माफिया टिपूच्या टोळीवर मोक्का : तीन साथीदारांना अटक, १७ गुन्ह्यांची नोंद

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबईतील कांदिवली पूर्वेकडील समतानगर आणि कुरार परिसरात कथित गुन्हेगारी कारवायांमुळे दहशत निर्माण केल्याचा आरोप असलेल्या इम्तियाज हुसेन सय्यद उर्फ टिपू याच्या टोळीवर मुंबई पोलिसांनी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली आहे.

समतानगर पोलिसांनी या प्रकरणात टोळीतील तीन साथीदारांना अटक केली आहे. राज रवी शर्मा उर्फ कालू, जितेश राजपूत आणि राधा राजपूत अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मुख्य आरोपी टिपू हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्याविरोधात यापूर्वी १७ गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अमली पदार्थांची विक्री आणि इतर गुन्हेगारी कारवायांमध्ये त्याचा सहभाग असल्याचा आरोप आहे.

१२ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे सुमारे ३ वाजता कांदिवली पूर्वेकडील हनुमाननगर परिसरात अनमोल डेअरीजवळ मारहाणीची घटना घडली होती. बिर्याणी सेंटरमधील किरकोळ वादातून आरोपींनी काही तरुणांवर हल्ला केल्याचा आरोप आहे. यावेळी चाकूचा धाक दाखवून दगड आणि लाकडी बांबूच्या साहाय्याने मारहाण करण्यात आली होती.

राज्यात दररोज ८.७२ कोटींचा गंडा : आठ महिन्यांत २,११९ कोटींची फसवणूक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – महाराष्ट्रात चालू वर्षाच्या (२०२६) पहिल्या आठ महिन्यांत सायबर गुन्हेगारांनी नागरिकांना तब्बल २,११९.६९ कोटी रुपयांचा गंडा घातला आहे. म्हणजेच राज्यात दररोज सरासरी ८.७२ कोटी रुपयांची सायबर फसवणूक होत आहे. सायबर पोलिसांनी हस्तक्षेप करूनही फसवणुकीतील केवळ ५८७.४० कोटी रुपये, म्हणजेच एकूण रकमेच्या २७.७१ टक्के रक्कम वाचवण्यात यश आले आहे. त्यामुळे नागरिकांना १,५३२.२९ कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले आहे. महाराष्ट्र सायबरच्या नोंदीनुसार, यंदा ३१ ऑगस्टपर्यंत संस्थेकडे सायबर फसवणुकीच्या २ लाख ८ हजार ७६७ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. २०२५ मध्ये एकूण २ लाख ८४ हजार २८१ तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यामध्ये ३,५३६.४२ कोटी रुपयांची फसवणूक झाली होती. त्यापैकी ६१७.५२ कोटी रुपये वाचवण्यात आले होते. सायबर फसवणुकीत गमावलेली रक्कम परत मिळवण्याचे पोलिसांसमोरील आव्हान दिवसेंदिवस कठीण होत आहे. कारण तपास यंत्रणांना पैशांचा माग काढण्यापूर्वीच सायबर गुन्हेगार वेगाने पैसे अन्य खात्यांमध्ये वळवत आहेत. ऑनलाइन व्यवहारातील फसवणूक रोखण्यासाठी व्यवहारानंतरचा पहिला तास म्हणजेच 'गोल्डन अवर' अत्यंत महत्त्वाचा मानला जात होता. मात्र, तत्काळ बँकिंग सेवा, डिजिटल पेमेंट व्यवस्था आणि अत्याधुनिक पैसे हस्तांतरण प्रणालींमुळे या पहिल्या तासाचे महत्त्वही कमी होत आहे.

महाराष्ट्रात गुलाबी थंडीची चाहूल

दिवसा उन्हाचा चटका, रात्री गारवा, पुढील काही दिवस हवामान कोरडे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – नोव्हेंबर महिन्यात राज्यातील हवामानात बदल जाणवू लागला आहे. पहाटे आणि रात्रीच्या वेळी गारवा वाढत असून, दुपारच्या वेळेत मात्र उन्हाचा चटका कायम आहे. १२ नोव्हेंबर रोजी राज्यातील बहुतांश भागांत कोरडे हवामान राहण्याचा अंदाज आहे.

उत्तर भारतातील हवामानातील बदलांचा परिणाम महाराष्ट्रातील तापमानावर होत असून, पुढील काही दिवसांत किमान तापमानात आणखी घट होण्याची शक्यता आहे. कोकणात सध्या दिवसा उष्णता आणि रात्री गारवा असे वातावरण आहे. या भागात कमाल तापमान ३३ ते ३५ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान १८ ते २० अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. पुढील ४ ते ५ दिवस कोकणात पावसाची शक्यता कमी असून हवामान कोरडे राहू शकते.

उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत कमाल तापमान ३२ अंश, तर किमान तापमान २१ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांत तापमानात २ ते ३ अंशांची घट झाल्याने रात्री गारवा जाणवू लागला आहे.

पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रात कमाल तापमान २९ अंश, तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. दुपारी उन्हाचा चटका जाणवत असला तरी सकाळी आणि रात्री वातावरण थंड राहत आहे. या भागात कोणताही हवामान अलर्ट जारी करण्यात आलेला नाही.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.

मालमत्तेच्या वादातून मुलाने केला वडील आणि भावावर गोळीबार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – मालमत्तेच्या वादातून एका तरुणाने स्वतःच्याच वडिलांवर आणि भावावर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना टिटवाळ्यात घडली आहे. या घटनेत वडिलांच्या पोटात तर भावाच्या खांद्याला गोळी लागली आहे. दोघांनाही डोंबिवलीतील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीचे नाव कल्पेश शेलार, वय ३५, असे आहे. कल्याण तालुका पोलिसांनी त्याला गुरवली पाडा, टिटवाळा येथून अटक केली. तो पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी त्याला पकडले. यावेळी त्याच्यासोबत असलेली त्याची पत्नी रसिका शेलार, वय ३२, हिलाही अटक करण्यात आली आहे. गोळीबाराच्या वेळी ती सोबत होती आणि तिने रोखण्याचा प्रयत्न केला नाही, असा पोलिसांचा आरोप आहे. दोघांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्पेश हा गेल्या बराच काळापासून वडील बळीराम शेलार, वय ५५, आणि भाऊ भरत शेलार, वय ३२, यांच्याकडे कुटुंबाच्या शेतजमिनीत वाटा मागत होता. गेल्या वर्षभरापासून तो कुटुंबापासून वेगळा राहत होता. मंगळवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास कल्पेश वडिलांच्या घरी गेला. त्यावेळी भाऊही घरीच होता. वाद वाढल्यानंतर त्याने गोळीबार केल्याचा आरोप आहे. एक गोळी वडिलांच्या पोटात लागली, तर दुसरी गोळी भावाच्या खांद्याला लागली. गोळीचा आवाज आणि आरडाओरडा ऐकून शेजारी धावत आले.

राज्यात लवकरच समान नागरी कायदा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुनरुच्चार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – संविधानामध्ये समान नागरी कायद्याचा स्पष्ट उल्लेख आहे. राज्यांनी नागरिकांसाठी समान नागरी कायदा लागू करण्याच्या दिशेने प्रयत्न करावेत, असे संविधानाचे मार्गदर्शक तत्त्व आहे.

त्यामुळे या विषयावर सरकारने घेतलेली भूमिका घटनात्मक आहे. समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सामाजिक सहमती आणि योग्य प्रक्रिया महत्त्वाची असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी राज्यात समान नागरी कायदा लागू करण्याचा पुनरुच्चार केला.

दिवाळीनिमित्त वर्षा निवासस्थानी पत्रकारांसाठी आयोजित स्नेहमीलन कार्यक्रमात फडणवीस यांनी विविध विषयांवर मनमोकळा संवाद साधला. गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत बोलताना फडणवीस म्हणाले, आपण कोणत्याही व्यक्तीच्या नाही तर केवळ संस्थेच्या मागे उभे राहिलो. पण केवळ साडेपाच हजार सभासद असलेल्या एखाद्या ग्रामपंचायतीपेक्षा छोट्या असलेल्या गोकुळ संस्थेत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राजकारण आणले.

त्यांच्यामुळेच या प्रकरणाला राजकीय वळण मिळाले. काँग्रेसला देशात अतिडाव्या विचारसरणीचे सरकार आणायचे आहे; मात्र देशातील जनता ते स्वीकारणार नाही, असा आरोपही त्यांनी केला.

तांत्रिक कोंडी फोडण्यासाठी सहकार कायद्यात दुरुस्ती

गोकुळवर संस्थेवर ताबा मिळवायचा असता तर सरकारने कधीच मिळिवला असता. मात्र तसे काहीही न करता दोन्ही पक्षांकडे बहुमत नसल्याने तांत्रिक कोंडी फोडण्यासाठी सहकार कायद्यात सुधारणा करण्यात आली. त्यानंतरही गोकुळबाबत सतेज पाटील, हसन मुश्रीफ आणि विनय कोरे या नेत्यांनी एकत्र बसून निर्णय घेतल्यास आम्ही कायद्याची अंमलबजावणी करणार नाही. त्या चार संचालकांना पाठविणार नाही, अशी भूमिका आपण जाहीर केली होती.

दोन्ही राष्ट्रवादींचे विलिनीकरण आमच्याशिवाय होणार नाही

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणावरून चर्चा सुरू असली तरी त्यांचे विलिनीकरण आमच्याशिवाय होणार नाही. तसेच दोन्ही पक्षांच्या विलिनीकरणाबाबत काय सुरू आहे हे फक्त दोन्ही पक्षांचे अध्यक्ष सांगू शकतात, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले म्हणाले.

यावेळी त्यांनी राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत भूमिका स्पष्ट केली. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबाबत काय सुरू आहे, हे एकतर शरद पवार सांगू शकतील किंवा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार सांगू शकतील. बाकी नेते सांगतात त्याला काहाही अर्थ नसल्याचे फडणवीस म्हणाले.

'अरे.. स्कॅम झालाय!' मिठाईच्या दुकानात टठ कोडची केली अदला बदल, ग्राहकांचे पैसे लंपास : व्हिडिओ व्हायरल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – दिवाळीच्या गर्दीचा फायदा घेत एका तरुणाने मिठाईच्या दुकानातील पेमेंट टठ कोड बदलून ग्राहकांची रक्कम स्वतःच्या खात्यात वळवल्याचा प्रकार उत्तर प्रदेशातील गोंडा येथे उघडकीस आला आहे. ग्राहकांनी पैसे भरल्यानंतर त्यांना पेमेंट यशस्वी झाल्याचा संदेश मिळत होता. मात्र, ही रक्कम दुकानदाराच्या खात्यात जमा होण्याऐवजी दुसऱ्याच व्यक्तीच्या खात्यात जात होती. दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर हा प्रकार समोर आला. गर्दीचा फायदा घेत टठ कोड बदलला ही घटना दिवाळीच्या दिवशी नगर कोतवाली परिसरातील एका मिठाईच्या दुकानात घडली.

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२७६/२०२६ ने.ता.३०/११/२०२६

अर्जदार :- दिलीप जंगलुजी कुकडे
वय अं.६६ वर्ष, धंदा-शेती
रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- सचिव साहेब
ग्रामपंचायत कार्यालय कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांची आई **मयत शेवंताबाई जंगलुजी कुकडे, यांचा मृत्यू दि.१३/०३/२०१८ रोजी कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील **मयत शेवंताबाई जंगलुजी कुकडे, यांचा मृत्यू दि.१३/०३/२०१८ रोजी कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.३०/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख २७/१०/२०२६ रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

वरुड ते डवरगाव सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाला वेग

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

आमदार उमेश यावलकर यांच्या पुढाकाराने नागरिकांना दिलासा



वरुड – वरुड ते डवरगाव या महत्त्वपूर्ण मार्गाच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाला आता वेग आला असून गेल्या ५ वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेला रस्त्याचा प्रश्न विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करु लागला आहे. आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्या पुढाकारामुळे या रस्त्याच्या कामाला गती मिळाल्याने डवरगावसह परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. कार्यकाळात वरुड मागील पाच वर्षांच्या तालुक्यातील रस्ते विकासाकडे अपेक्षित लक्ष देण्यात आले नाही, अशी नाराजी नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. रस्ते, पाणी, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधांचा विकास करणे ही लोकप्रतिनिधींची महत्त्वाची जबाबदारी असते. मात्र अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्यांच्या प्रश्नांमुळे नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत होता. लोकप्रतिनिधित्व हे केवळ पदापुरते मर्यादित न राहता जनतेच्या समस्या प्रत्यक्ष कृतीतून सोडविणारे असावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

आता आ.उमेश यावलकर यांच्या पुढाकारातून वरुड ते डवरगाव सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाला गती मिळाल्याने परिसराच्या विकासाला चालना मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

डवरगावच्या नागरिकांच्या वतीने आ.चंदू यावलकर यांचे सरपंच लतिका बोडनासे, उपसरपंच इंदिरा कठाणे, चंद्रकांत बोडनासे, अंकुश बोडनासे, योगेश बोडनासे, धीरज बोडनासे, सारंग बोडनासे, मुकेश बहुरुपी, दीप धांडे, विठ्ठल वडस्कर, गजानन जाने, पुंडलिक निकम, पुरुषोत्तम जाने, प्रणित धोटे, अमोल ढोले, अजय गाडगे, श्रीकृष्ण पाटील, सुनील गावंडे, वासुदेव पाटील, सचिन कठाणे, सुखदेव गाडगे, जगदीश बहुरुपी, राहुल कुमारे, शुभम धोटे, गजानन कठाणे, विठ्ठल पाटील आणि विनोद सोनुले यांनी आभार मानले आहेत.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरमध्ये भूकंपाचा विशेष अभ्यास, जीएसआयचे पथक तैनात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नाशिक – नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७-२८ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला वेग आला असतानाच



त्र्यंबकेश्वर परिसरातील भूगर्भीय

हालचालींचा अभ्यास करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. कुंभमेळ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा आणि लाखो भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वाचा मानला जात आहे. राज्य शासनाच्या विनंतीनुसार भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाने (जीएसआय) त्र्यंबकेश्वर परिसरात विशेष पथक पाठवले आहे. या पथकाकडून परिसरातील भूगर्भीय हालचालींवर २४ तास लक्ष ठेवले जात आहे. यासाठी चार अत्याधुनिक यंत्रांचा वापर करण्यात येत असून, जमिनीत होणाऱ्या कंपनांची सातत्याने नोंद घेतली जात आहे. कुंभमेळ्याच्या कामांच्या सुरक्षिततेवर लक्ष सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये देशभरातून लाखो भाविक, साधू-महंत आणि पर्यटक येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून रस्ते, पूल, घाट, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य आणि वाहतूक व्यवस्थेसह विविध विकासकामे सुरू आहेत. मोठ्या प्रमाणावर बांधकामे होत असल्याने या परिसराची भूगर्भीय स्थिती समजून घेणे आवश्यक आहे.

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२७७/२०२६ ने.ता.१४/१२/२०२६

अर्जदार :- नसीम बेगम अब्दुल सत्तार (माहेरचे नांव)

नसीम अकतर रियाज अली (सासरचे नांव)

वय अं.६५ वर्ष, धंदा-गृहिणी

रा.शनिवार पेठ, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे नसीम बेगम अब्दुल सत्तार हिचा जन्म दि.२६/०२/१९६१ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे नसीम बेगम अब्दुल सत्तार हिचा जन्म दि.२६/०२/१९६१ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.१४/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२६/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२७५/२०२६ ने.ता.०८/१२/२०२६

अर्जदार :- नाहीद अख्तर अब्दुल सत्तार (माहेरचे नांव)

नाहीद अख्तर अब्दुल इम्रान (सासरचे नांव)

वय अं.४९ वर्ष, धंदा-गृहिणी

रा.अस्मा कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे नाहीद अख्तर अब्दुल सत्तार हिचा जन्म दि.०४/१२/१९७७ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे नाहीद अख्तर अब्दुल सत्तार हिचा जन्म दि.०४/१२/१९७७ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२६/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२७४/२०२६ ने.ता.१६/१२/२०२६

अर्जदार :- आरिफ खान वहाब उर्फ वाहाब खान

वय अं.५९ वर्ष, धंदा-शेती

रा.शनिवार पेठ, जुना दायरा, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **यांनी त्यांची बहिण नामे शबिना परवीन वहाब उर्फ वाहाब खान हिचा जन्म दि.१५/०६/१९८२ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **त्यांची बहिण नामे शबिना परवीन वहाब उर्फ वाहाब खान हिचा जन्म दि.१५/०६/१९८२ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.१६/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२६/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२७३/२०२६ ने.ता.०७/११/२०२६

अर्जदार :- अनवर खान वहाब खान

वय अं.४८ वर्ष, धंदा-शेती

रा.शनिवार पेठ, जुना दायरा, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे अनवर खान वहाब खान याचा जन्म दि.२४/०७/१९७६ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे अनवर खान वहाब खान याचा जन्म दि.२४/०७/१९७६ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि. /१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२६/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

'दुष्काळात तेरावा महिना'! रील बनवण्याच्या नादात फटाक्यांची आतषबाजी : पाच एकर ऊस जळून खाक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नांदेड – महाराष्ट्रात आधीच भीषण दुष्काळजन्य परिस्थिती असताना, नांदेडमधून एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे.



दिवाळीत रील शूट करण्याच्या नादात काही जणांनी केलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे एका हतभागी शेतकऱ्याचे उभे ५ एकर ऊसाचे शेत जळून खाक झाले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे आधीच आर्थिक संकटत असलेल्या नांदेडच्या त्या शेतकऱ्यावर अक्षरशः 'दुष्काळात तेरावा महिना' अशी दयनीय परिस्थिती ओढवली असून, वर्षभर केलेल्या कष्टावर अवघ्या काही सेकंदांत पाणी फेरले गेले आहे. रील शूट करताना फटाक्यांची आतषबाजी मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर वळण रस्त्यावर काही रील स्टार तरुण-तरुणी व्हिडिओ शूट करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी फटाक्यांची आतषबाजी केली. या फटाक्यांमुळे जवळच असलेल्या ऊसाच्या शेताला आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले आणि शेतातील मोठ्या क्षेत्रा-वरील ऊस जळून खाक झाला. शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान होण्याची शक्यता शेतकरी माणिकराव शिंदे यांनी मोठ्या कष्टाने ऊसाचे पीक घेतले होते. मात्र, या आगीमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले आहे. आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यावर आता आर्थिक संकट ओढवले आहे.

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.२७२/२०२६ ने.ता.०७/१२/२०२६

अर्जदार :- सईफाबानो अब्दुल सत्तार (माहेरचे नांव)

सईफाबानो अकतर मसुद अहमद खान (सासरचे नांव)

वय अं.५७ वर्ष, धंदा-गृहिणी

रा.दुल्हा गेट, अचलपुर, ता.अचलपुर, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे सईफाबानो अब्दुल सत्तार हिचा जन्म दि.३०/०८/१९७९ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे सईफाबानो अब्दुल सत्तार हिचा जन्म दि.३०/०८/१९७९ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२६/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९९४/२०२६ ने.ता.१७/१२/२०२६

अर्जदार :-

१) श्रीमती आशा भिमरावजी शियाले, वय अं.५८ वर्ष, धंदा-गृहिणी, २) हेमंत भिमराव शियाले, वय अं.३६ वर्ष, धंदा-शेती, ३) ललिता भिमराव शियाले, वय अं.३४ वर्ष, धंदा-शेती, क्र.१ ते ३ रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत भिमराव श्रावण शियाले, रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३१/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९९५/२०२६ ने.ता.१६/१२/२०२६

अर्जदार :-

१) शुभम विष्णुजी धोटे, वय अं.२७ वर्ष, धंदा-खाजगी नोकरी रा.कुरळी, ता.वरुड,जि.अमरावती

२) योगिता विष्णुजी धोटे (लग्नाआधीचे नांव) सौ.योगिता आकाशजी ठाकरे (लग्नानंतरचे नांव) वय अं.२५ वर्ष, धंदा-गृहिणी रा.अर्जुन नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत विष्णु नत्थुजी धोटे व मयत लता विष्णु धोटे, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **३१/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१०३२/२०२६ ने.ता.१६/१२/२०२६

अर्जदार :-

१) श्रीमती वंदना संजयराव नागदेवे, वय अं.५६ वर्ष, धंदा-गृहिणी, २) चेतन संजयराव नागदेवे, वय अं.२७ वर्ष, धंदा-शिक्षण, ३) आदित्य संजयराव नागदेवे, वय अं.२५ वर्ष, धंदा-शिक्षण, सर्व रा.कृष्णार्पण कॉलनी वरुड, ता.वरुड,जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत संजय श्रीरामजी नागदेवे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०७/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड



पोषक हवामानामुळे यंदा द्राक्ष निर्यातीत वाढीचा अंदाज : राज्यातील ३ हजार ५५१ शेतकऱ्यांची निर्यातीसाठी नोंदणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

लासलगाव – यंदाच्या द्राक्ष हंगामाच्या सुरुवातीपासूनच पिकाला पोषक हवामान लाभल्याने द्राक्षवेलींची वाढ चांगली झाली आहे. त्यामुळे यंदा दर्जेदार उत्पादन हाती येण्याची अपेक्षा असून, द्राक्षांची गुणवत्ता, गोडी, रंग आणि आकार चांगला



राहण्याची शक्यता आहे. याचा सकारात्मक परिणाम द्राक्ष निर्यातीवर होणार असून, यंदा निर्यातीत वाढ होईल, असा अंदाज महाराष्ट्र द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष कैलास भोसले यांनी व्यक्त केला. गतवर्षी अतिवृष्टीमुळे राज्यातील ७० टक्क्यांहून अधिक द्राक्षबागांमध्ये अपेक्षित फलधारणा झाली नव्हती. त्यामुळे द्राक्ष उत्पादकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले होते. मात्र, यंदा परिस्थिती तुलनेने अनुकूल आहे. राज्यातील द्राक्ष पिकांची फळछाटणी पूर्ण झाली असून, एप्रिल-मे महिन्यांत पोषक हवामान राहिल्याने वेलींवर सूक्ष्म घडांची चांगली निर्मिती झाली आहे. यंदा द्राक्ष उत्पादनात पाच ते दहा टक्क्यांची घट होण्याची शक्यता असली, तरी त्याचा निर्यातीवर फारसा परिणाम होणार नसल्याचे भोसले यांनी सांगितले. सध्या दुष्काळ आणि पाणीटंचाईचे संकट असतानाही शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून द्राक्षपीक चांगल्या प्रकारे जोपासले आहे.

जिल्हा परिषद शिक्षकांच्या पदोन्नतीला तूर्त स्थगिती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेला तूर्त स्थगिती देण्याचे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचा अंतरिम किंवा अंतिम आदेश प्राप्त होईपर्यंत पदोन्नतीची प्रक्रिया पुढे नेऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाशी संलग्न महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या प्राथमिक विभागाने शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत शासनाला सविस्तर निवेदन दिले होते. या निवेदनातील मागण्यांवर चर्चा करण्यासाठी राज्यमंत्री भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन आणि मोईन ताशीदार यांच्यासह शिक्षक परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत पदोन्नती प्रक्रियेबरोबरच शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित २८ प्रमुख मागण्यांवर चर्चा करण्यात आली. शिक्षकांवरील अशासकीय कामांचा अतिरिक्त भार कमी करण्याबाबत राज्यमंत्र्यांनी विशेष निर्देश दिले. प्रत्येक केंद्र शाळेत कंत्राटी पद्धतीने डेटा एंट्री ऑपरेटर नेमण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१३९८०० रु.(१०ग्रॅम)
२२.कॅ सोने - १२८१५०रु.(१०ग्रॅम)
चांदी - २००००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	२६०० -	२८५०
गहू -	२६५० -	३०००
तूर -	१०००० -	१०७११
मूग -	७५०० -	८६५०
उडीद -	७८०० -	८५००
हरभरा -	६८०० -	७३००
सोयाबिन -	६८०० -	७१६१
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	१२००० -	१३०००
भुईमूग -	७२५० -	७४५०
मका -	२८०० -	२९००

सुटीच्या दिवसांतही शिक्षकांचा ज्ञानदानाचा वसा कायम

नवोदय प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची विशेष तयारी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – शाळेला सुटी लागली की विद्यार्थ्यांसाठी आनंद, खेळ आणि विरंगुळ्याचे दिवस सुरु होतात.

स्वतःच्या सुटीचा विचार बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सुरु असलेले त्यांचे प्रयत्न खऱ्या अर्थाने शिक्षक धर्माचे दर्शन घडविणारे ठरत आहेत. वरुड पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये हे प्रेरणादायी चित्र पाहायला मिळत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालयात प्रवेशाची संधी मिळावी, त्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा मिळावी आणि स्पर्धेच्या युगात त्यांनी



आत्मविश्वासाने वाटचाल करावी, या उद्देशाने गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांच्या संकल्पनेतून नवोदय प्रवेश परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग सुरु करण्यात आले आहेत. या उपक्रमाला जिल्हा परिषद शाळांतील शिक्षक व शिक्षिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. सुटीच्या काळातही हे वर्ग सुरु असल्याने पालक वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.

तालुक्यातील पुसली, वघाळ, पुसला, करंजगाव, वंडली, काटी, गाडेगाव, गव्हाणकुंड, चांदस आदी जिल्हा परिषद शाळांमध्ये दररोज दीड ते दोन तास विशेष मार्गदर्शन वर्गांचे आयोजन केले जात आहे.

या वर्गांमध्ये विद्यार्थ्यांना केवळ प्रश्नांची उत्तरे सोडविण्याचे प्रशिक्षण न देता त्यांची विचारक्षमता, तर्कशक्ती, आकलनशक्ती, वेळेचे नियोजन आणि आत्मविश्वास विकसित करण्यावर विशेष भर दिला जात आहे. सराव परीक्षा, शंकानिरसन आणि वैयक्तिक मार्गदर्शनाच्या



"आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या मेहनती इतकाच शिक्षकांचा त्याग, वेळ आणि मार्गदर्शन मोलाचे ठरते. सुटीच्या दिवसांत स्वतःच्या विश्रांतीपेक्षा विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना प्राधान्य देणारे वरुड पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद शिक्षक शिक्षिका हे खऱ्या अर्थाने समाजाचे शिल्पकार असून या सर्व शिक्षकांचा शिक्षण विभागाला सार्थ अभिमान आहे. तालुक्यातील इयत्ता पाचवा वर्ग असलेल्या शाळांमध्ये उत्स्फुर्तपणे मिशन नवोदयचे वर्ग राबविल्या जात आहेत. शिक्षकांच्या या समर्पित वृत्तीचा सन्मान करण्यासाठी आपण नि:शब्द आहोत, अशी प्रतिक्रिया पं.स. गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी व्यक्त केली.

माध्यमातून विद्यार्थ्यांची तयारी अधिक भक्कम करण्याचे काम शिक्षक करीत आहेत, अशी माहिती शिक्षण विस्तार अधिकारी मोहन नारिंगे यांनी दिली.

या उपक्रमात गव्हाणकुंडच्या अंजली पोटे, करंजगावच्या सुरेखा पोकळे, वघाळचे प्रकाश विंचूरकर, गाडेगावचे राजू पवार, पुसलाचे विवेक देवते, काटीच्या सुनीता बागडे, पुसलीच्या स्मिता काळे, वंडलीचे संजय बेले, चांदसचे शैलेश कुमार बोथे व रोशनी कनाटे, खडकाचे खुशाल अंबाडकर हे शिक्षक-शिक्षिका सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील स्वप्नांना पंख देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. शिक्षकांच्या या निस्वार्थी प्रयत्नांतून निश्चितच अनेक गुणवंत विद्यार्थी घडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

औषध निर्मिती कंपनीच्या परवाना निलंबनाला एचसी कडून तात्पुरती स्थगिती

मंत्र्यांनी अपिलावर तातडीने सुनावणी घेण्याचेही दिले निर्देश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – छत्रपती संभाजीनगर येथील वाळूंज औद्योगिक वसाहतीतील 'क्युरिया इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीच्या औषध निर्मिती परवान्याचे निलंबन उच्च न्यायालयाने तात्पुरते स्थगित केले.

याचवेळी राज्याच्या अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी कंपनीच्या अपिलावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा, तोपर्यंत परवाना निलंबनाच्या आदेशाला स्थगिती कायम राहील,



असे न्यायालयाने स्पष्ट केले. मुख्य न्यायमूर्ती एम. सी. त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

अमेरिकेतील 'क्युरिया ग्रुप'चा भाग असलेल्या क्युरिया इंडियाच्या वाळूज येथील कारखान्यात औषधांसाठी लागणारे सक्रिय घटक तयार केले जातात. औषध आणि सौंदर्यप्रसाधने कायदा व नियमांचे उल्लंघन आणि १६ त्रुटी आढळल्याने छत्रपती संभाजीनगर विभागाच्या सहआयुक्तांनी ३० ऑक्टोबर रोजी कंपनीचा परवाना २१ दिवसांसाठी निलंबित केला होता.

या कारवाईविरोधात कंपनीने ३ नोव्हेंबरला एफडीए मंत्र्यांकडे अपील दाखल केले होते. कंपनीच्या वतीने ज्येष्ठ वकील बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. जानेवारी २०२४ मधील अशाच एका प्रकरणात उच्च न्यायालयाने अपिलावर निर्णय होईपर्यंत निलंबन आदेशाला अंतरिम स्थगिती दिली होती, याकडे त्यांनी लक्ष वेधले.



